# बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे सप्टेंबर– २०१८

## पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | पायधुनी पोलीस ठाणे गुरक्र.७३/२०१७ कलम ३७६(ड), ३७६(२), ५०६(२), ३४१ भा.दं.वि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक ०८/०३/२०१७ रोजी ते दिनांक १७/०३/२०१७ रोजी ०४.०९ वा.चे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | सुरंगी मंझील, ५ वा माळा, झकेरीया स्ट्रीट, पायधुनी, मुंबई ०३. |
| ४ | **फिर्यादी** | श्रीमती. गुडडी छोटेलाल कनोजिया वय २७ वर्षे |
| ५ | **बळीत** | फिर्यादी स्वत: |
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | –– |
| ७ | **हस्तगत मालमत्ता** | –– |
| ८ | **आरोपी अटक** | १) संतोष रामसागर कनोजीया वय २७ वर्षे व<br>२) मोह. फारुख अब्दूल लतीफ खान वय २८ वर्षे<br>**अटक दिनांक १७/०३/२०१७ रोजी** |

पायधुनी पोलीस ठाणे गुरक्र.७३/२०१७ कलम ३७६(ड), ३७६(२), ५०६(२), ३४१ भा.दं.वि.या गुन्हयात दिनांक ०८/०३/२०१७ रोजी ते दिनांक १७/०३/२०१७ रोजी ०४.०९ वा.चे दरम्यान सुरंगी मंझील, ५ वा माळा, झकेरीया स्ट्रीट, पायधुनी, मुंबई ०३. याठिकाणी यातील आ.क्र. १) संतोष रामसागर कनोजीया याने फिर्यादींना नोकरीस लावण्याचे आमिष दाखवून त्यांचे उत्तर प्रदेश येथील येथील मुळ गावावरून भिवंडी येथे त्यांचे राहते घरी घेवून आला व फिर्यादी यांचेवर वेळोवेळी लैंगिक अत्याचार केला. त्याचप्रमाणे फिर्यादी यांनी कोणाला सांगितले तर ठार मारण्याची धमकी दिली. दिनांक १६/३/२०१७ रोजी रात्रौ आ.क्र १ याने व आरोपी क्रमांक २) मोह. फारुख अब्दूल लतीफ खान याच्या राहते ठिकाणी फिर्यादीस घेवून आला व आ.क्र. १ व २ यांनी फिर्यादी सोबत अंगलट करून आ.क्र. १ याने आ.क्र. २ चे मदतीने फिर्यादीवर लैंगिक अत्याचार केला. फिर्यादी स्वत:ला वाचविण्याकरिता ५ व्या माळयावरील खिडकीतून ( घटनास्थळावरून ) खाली उतरत असताना पडून त्या गंभीर जखमी झाल्या म्हणून फिर्यादी यानी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १७/०३/२०१७ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पायधुनी पोलीस ठाणेच्या पथकाने मानवी कौशल्य वापरून तात्काळ दिनांक १७/०३/२०१७ रोजी नमुद गुन्हयातील आरोपी क्र.१) संतोष रामसागर कनोजीया वय २७ वर्षे व २) मोह. फारुख अब्दूल लतीफ खान वय २८ वर्षे यांना रितसर अटक केली. सदर पथकाने अटक आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण व सातत्यपुर्ण तपास करुन आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मिळवुन दिनांक १३/०६/२०१७ रोजी मा. महानगर दंडाधिकारी, ०२ रे न्यायालय, शिवडी, मुंबई येथे कोर्ट केस क्र.६७८/पीडब्ल्यू/२०१७ अन्वये दोषारोप पत्र सादर केले तसेच सदर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळवुन मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे दिनांक २०/०७/२०१७ रोजी सेशन केस क्र.४५१/२०१७ अन्वये सदरचा गुन्हा वर्ग करण्यात आला.

सदर पथकाने नमुद खटल्याच्या सुनावणीच्या दरम्यान खटल्यातील प्रत्यक्ष बळीत साक्षीदार व तिचे आई–वडिल साक्षीदार यांना उत्तर प्रदेश येथून साक्षकामी आणले. नमुद गुन्हयातील बळीत महिला ही मंद बुध्दीचे असल्याचे पथकाचे निदर्शनास आल्याने व बळीत महिलेचे आई–वडिल हे आरोपी संतोष कनोजिया याचे नातेवाईक असल्याने ते त्यांचे साक्षीत आरोपीतांना मदत करणार हे निश्चित वाटल्याने सदर पथकाने बळीत महिलेस वेगळे करुन, तिला व्यवस्थित ब्रिफींग केले. तसेच तिच्यावर झालेल्या अन्यायाबाबत फिर्यादीचे खटल्यात साक्षीबाबत महत्व पटवुन तिला चिफ व क्रॉस बाबत माहिती देवुन सदर खटल्यात साक्ष देण्यास प्रवृत केले. याकारणाने फिर्यादी यांची मा. न्यायालयासमक्ष उत्तम साक्ष झाली. सदर साक्षी दरम्यान मा. न्यायालयाच्या लक्षात आले की, बळीतावर झालेल्या अत्याचारामुळे ती थोडी मंद बुध्दी सारखी जबाब देत असुन, तिला प्रश्नांचे उत्तरे देण्यास फार अवधी लावत असल्याचा कोर्टाने निष्कर्ष नोंदविला. तसेच बळीत महिलेचे आई–वडील हे प्रॉसिक्युशनला सपोर्ट करणार न वाटल्याने बळीताचे आई–वडील यांची कोर्टात साक्ष न घेता, कोर्टात त्यांची

फक्त हजेरी लावुन त्यांच्या साक्षीची आवश्यकता नसल्याचे मा. न्यायालयास सांगुन सरकारी अभियोक्ता त्यांना परत पाठविले.

पायधुनी पोलीस ठाणेचे पैरवी अधिकरी व कोर्ट कारकुन अंमलदार यांनी भिवंडी परिसरातील इतर साक्षिदार, तसेच पायधुनी येथील घटनास्थळाच्या ठिकाणचे सांक्षीदार यांना विविध ठिकाणाहुन आणुन फिर्यादी, पंच, साक्षिदार, डॉक्टर यांना चिफ व क्रॉस जबाब सबंधी योग्यती ब्रिफींग करुन मा. सत्र न्यायालयात हजर ठेवल्याने त्यांचे जबाब खटल्याच्या शिक्षेस अनुकूल नोंदविले गेले व इतर सबळ शास्त्रोक्त पुरावा, वस्तुनिष्ठ पुरावा, शास्त्रीय पुरावा, प्रत्यक्ष मौख्यिक पुरावा मा. सत्र न्यायालयासमोर सादर केला. व आरोपीच्या वकीलांनी त्यांचेकडुन जो सरकारी अभियोक्ता यांना संशय आल्याने साक्ष न घेता परत पाठविलेले बळीत मुलीचे आई–वडील यांना साक्षिदार म्हणुन हजर ठेवण्यात आले होते. ते आरोपीचे नातेवाईक असल्याने त्यांने आरोपीच्या वकीलांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आरोपीच्या बाजुने फायदा होईल अशा प्रकारची दिली होती. परंतु त्यांचे सर्व मुद्दे सरकारी अभियोक्ता यांनी ते खोटे बोलत असल्याचे व तपासात कोठेही निष्पन्न न झाल्याचे मा. न्यायालयास पटवुन दिले. तसेच ऑर्ग्युमेंटचे वेळी आरोपीतांचे वकीलांनी दोषमुक्तीसाठी मांडलेले सर्व मुद्दे सुप्रीम कोर्टाचे तसेच हायकोर्टाचे ९ Citations मा. सत्र न्यायालयास सादर करुन त्यांचे सर्व मुद्दे खोडुन टाकले.

या सर्व साक्षी–पुराव्यावरून **<u>दिनांक २६/०९/२०१८ रोजी</u>** मा. सत्र न्यायालयाने यातील आरोपी संतोष कनोजिया व मोह. फारुख अब्दूल लतीफ खान यांना दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :–

**मा. न्यायालयाने अटक आ.क्र.१) संतोष रामसागर कनोजीया वय २७ वर्षे यास दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :–**

**अ)** भादवि. कलम ३७६(ड) प्रमाणे **२० वर्षे सश्रम कारावास** व रु.५,०००/–द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद,

**ब)** भादवि. कलम ३७६(२) (f, n) प्रमाणे **१० वर्षे सश्रम कारावास** व रु.२,०००/–द्रव्यदंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद,

**क)** भादवि. कलम ३४१ प्रमाणे ०१ महिना साधी कैद,

**मा. न्यायालयाने अटक आ. क्र.२) मोह. फारुख अब्दूल लतीफ खान वय २८ वर्षे यास दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :–**

**अ)** भादवि. कलम ३७६(ड) प्रमाणे **२० वर्षे सश्रम कारावास** व रु.५,०००/–द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद,

**ब)** भादवि. कलम ३४१ प्रमाणे ०१ महिना साधी कैद,

वरिल सर्व शिक्षा दोषसिध्द आरोपीने एकत्र भोगायच्या आहेत.

पायधुनी पोलीस ठाणेच्या पथकाने मानवी कौशल्याचा वापर करून फिर्यादींना नोकरीस लावण्याचे आमिष दाखवून मुळ गावावरून राहते घरी फिर्यादी यांचेवर वेळोवेळी लैंगिक अत्याचार करून फिर्यादी यांनी कोणाला सांगितले तर ठार मारण्याची धमकी दिली. तसेच साथीदारांच्या मदतीने संगनमताने फिर्यादीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या दोन आरोपीतांना अटक करून त्यांचेविरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोप पत्र दाखल केले व मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपींना शिक्षा झालेली आहे.

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना **माहे सप्टेंबर – २०१८ चे बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

## पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार :–

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे | अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | म. पोलीस निरीक्षक रागिणी महादेव भागवत | ४ | पो.शि.क्र.०३.११७१/राजेंद्र गणपत जाधव |
| २ | पोलीस उप निरीक्षक अतुल शंकर बनकर | ५ | पो.शि.क्र. ०८.०९६४/संदीप नारायण कांबळे |
| ३ | पोलीस उप निरीक्षक प्रकाश भिवा कदम | | |

—— ००० ——